शबरी आदिवासी वित्त व विकास मर्या., नाशिक नियमित वेतनश्रेणीतील अधिकारी/कर्मचा-यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत.

## महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग,
शासन निर्णय, क्रमांक-आविम-२००१/प्र.क्र.२५/का.३
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- ७ जुलै, २००४.

**वाचा :-** १) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक-आविम-१०९९/प्र.क्र.७/का.३, दिनांक १३ डिसेंबर, १९९९.

२) महाराष्ट्र राज्य सहकारी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ, नाशिक यांचे पत्र क्रमांक-आविम/प्रशा/ अस्था-४/ ८६/ २००३, दिनांक ११ ऑक्टोबर,२००३.

**प्रस्तावना:-** उपरोल्लेखित अ.क्र.१ च्या शासन निर्णयान्वये शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या अधिकारी/कर्मचारी आकृतीबंध त्यांच्या पदनिहाय वेतनश्रेणीसह मंजूर करण्यात आला आहे. शासन अधिसूचना वित्त विभाग क्रमांक-वेपूर-१२९८/ प्र.क्र.१३/ ९८/ सेवा-१०, दिनांक १० डिसेंबर, १९९८ अन्वये राज्य शासनाने राज्य शासकीय कर्मचा-यांना दिनांक १ जानेवारी, १९९६ पासून सुधारित वेतनश्रेणी मंजूर केली आहे. त्यामुळे शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या कर्मचा-यांना सुधारित वेतनश्रेणी लागु करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :-** उपरोक्त बाबीवर विचार होऊन शासनाने असा निर्णय घेतला आहे की, या शासन निर्णयासोबत जोडलेल्या प्रपत्रात दर्शविल्याप्रमाणे शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या आस्थापनेवरील नियमित अधिकारी/कर्मचा-यांना पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारित वेतनश्रेणी दिनांक १ एप्रिल, २००४ पासून लागू करण्यास मान्यता देण्यात यावी. सदर मान्यता खालील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहे :-

(अ) शासन निर्णय क्रमांक-पमाम-१०९८/ प्र.क्र.८२/ ९८/ सेवा- ५, दिनांक ११.१२.१९९८ तसेच शासन निर्णय क्रमांक-वाहभ- १०९८/ प्र.क्र.८३/ ९८/ सेवा- ५, दिनांक १४.१२.१९९८ मधील तरतूदींच्या मर्यादेत देय स्थानिक पुरक भत्ता, घरभाडे भत्ता व वाहतूक भत्ता मान्य करण्यात यावा.

(ब) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाला सद्या देय असलेले भत्ते शासकीय कर्मचा-यांना लागू असलेल्या भत्यांएवढे मर्यादित ठेवण्यात यावे.

(क) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचा महसुली खर्च कमी करण्याच्या दृष्टीने शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक- शासाउ-१०.०२/ प्र.क्र.२७/ २००३/ सा.उ. दिनांक

M.S. Co-op. Tribal Dev ... Adm. Branch

१८-८ २००३ नुसार शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळातील एकूण पदांना आढावा महामंडळाने तीन महिन्याच्या आत घ्यावा व त्याबाबतचा प्रस्ताव प्रशासकीय (आदिवासी विकास विभाग) विभाग मार्फत उच्चस्तर समितीच्या मान्यतेकरिता सादर करण्यात करावा.

(ड) सदर शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या कर्मचा-यांना दिनांक १ जानेवारी, १९९६ ते ३१ मार्च, २००४ या कालावधीतील वेतनाच्या फरकाची रक्कम/ थकबाकी अनुज्ञेय होणार नाही

२. या आदेशाच्या कोणत्याही तरतुदीच्या अंमलबजावणीसंबंधी कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास तो म. राष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत वित्त विभागाच्या सल्ल्याने सोडविण्यात येईल व त्या विभागाचा त्यावरील निर्णय अंतिम राहील.

३. सुधारित वेतनश्रेणीमुळे कर्मचा-यांना अदा करावयाच्या रकमेपोटी येणारा खर्च महामंडळास व्यवस्थापकीय अनुदानापोटी शासनाकडून मिळणा-या निधीतून भागविण्यात यावा.

हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक २६७/साउ, तसेच अनौपचारिक संदर्भ क्र.३३७/२००४ सेवा-९ दिनांक ३.७.२००४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(ह. स. पावरा)
अवर सचिव

प्रति,

मा. राज्यपाल यांचे सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
मा.मंत्री आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव
सर्व मा.मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. प्रधान सचिव (आ.वि.)
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या.नाशिक
व्यवस्थापकीय संचालक, शबरी वित्त व विकास महामंडळ मर्या.नाशिक
अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, नागपूर, अमरावती
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प